**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ५७९/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.युवराज परशराम ठाकरे
कार्यालय ज्ञानदा प्रकाशन , तहसिल कार्यालया वाडा जवळ
ता.वाडा, जि.पालघर

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी, टोकावडे उत्तर
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय टोकावडे उत्तर यांचे
कार्यालय, कल्याण मुरबाड रोड, ता.मुरबाड, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी, टोकावडे उत्तर
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय टोकावडे उत्तर यांचे
कार्यालय, कल्याण मुरबाड रोड, ता.मुरबाड, जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३/७/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/५/२०२१ | ---- | २८/१०/२०२१ | १५/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुनिल लक्ष्मण नाईक, सेवानिवृत्त अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.माधव गंगाराम डफडे, वनपरिक्षेत्र अधिकारी टोकावडे उत्तर उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *आपल्या कार्यक्षेत्रात झालेल्या विविध कामांची, उपलब्ध निधीची व खर्चाची माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती.*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१५/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*अपीलकर्ते यांनी उपलब्ध माहिती स्वीकारत असलेचे सांगुन बाकी माहिती राहिली असल्यास पुरवावी असे सांगितले. माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ते यांचे अपुर्ण माहिती असलेबाबत पत्र दिल्यानंतर आठ दिवसात विनामुल्य माहिती पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.१३/१२/२०२१ च्या पत्राव्दारे माहिती दिलेली आहे. सदर पत्र प्रत त्यांनी सादर केली.

तक्रारकर्ता यांना सुनावणी सूचना प्राप्त होऊन देखील ते सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते की, तक्रारकर्ता यांना माहिती दिली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जुलै, २०२५ .

Comp-३